# उद्योग-व्यवसायांच्या प्रगतीमध्ये कॉस्ट अकौंटंट्सचा मोठा वाटा

## के. लक्ष्मीशा यांचे प्रतिपादन

**औरंगाबाद, ता. ५ :** "उद्योग तसेच बँकिंग क्षेत्रामध्ये कॉस्ट अकौंटंट्सचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले असून. त्यांच्या प्रगतीमध्ये कॉस्ट अकौंटंट्सचा मोठा वाटा आहे," असे प्रतिपादन स्टेट बँक ऑफ हैदराबादचे उपमहाव्यवस्थापक के. लक्ष्मीशा यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडियाच्या औरंगाबाद शाखेच्या वतीने आयसीडब्ल्यूएच्या (कोलकत्ता) वर्गाचे उद्‌घाटन श्री. लक्ष्मीशा यांच्या हस्ते शनिवारी (ता. पाच) झाले. त्या वेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून कन्सेप्ट फार्माचे उपाध्यक्ष सुधीर टिपरे उपस्थित होते. दीपप्रज्वलनांने कार्यक्रमास प्रारंभ झाला. "उद्योगांमध्ये मालकाच्या खालोखाल कॉस्ट अकौंटंटना महत्त्वाचे स्थान असून, एका पैशाच्या फरकाने लाखो रुपयांचा नफा-तोटा होऊ शकतो. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक गोष्टीचे प्रमाणीकरण होत आहे. अशा वेळी कॉस्ट अकौंटंटचे महत्त्व दिवसागणिक वाढतच चालले आहे," असे श्री. लक्ष्मीशा म्हणाले. "उद्योगांचे अस्तित्व कॉस्ट अकौंटिंगवर अवलंबून असल्याने हा अभ्यासक्रम अतिशय आवश्यक असल्याचे,"



'आयसीडब्ल्यूए'च्या वर्गाच्या उद्‌घाटनप्रसंगी के. लक्ष्मीशा यांनी मार्गदर्शन केले. या वेळी उपस्थित आर. पी. कोरे, कन्सेप्ट फार्माचे उपाध्यक्ष सुधीर टिपरे, एस. आर. जोशी.

मत श्री. टिपरे यांनी व्यक्त केले. प्रारंभी एम. आर. पंडित आणि एच. बी. शहा यांनी स्वागत केले. एस. आर. पिंपळे यांनी परिचय करून दिला. चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी चॅप्टरतर्फे विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण, सभासदांसाठी कॉस्ट फोरम आणि सभासद, विद्यार्थी आणि उद्योगांसाठी विविध सेमिनार तसेच प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत असल्याची माहिती दिली. प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी अभ्यासक्रमासाठीची तयारी आणि तो पूर्ण केल्यानंतर उपलब्ध संधींची माहिती दिली. सूत्रसंचालन आणि आभार राजेश शुक्ला यांनी केले.